वन विकास करापासून मिळणा-या जमा रकमा पासून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजनासाठी निधी पुरवठा करणे.
सन २०१५-१६ करिता अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक- चाबाप्र-२०१५/प्र.क्र.११०/फ-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०३ फेब्रवारी, २०१६

पहा: १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) यांचे पत्र क्र. कक्ष-२(१)/ असं/प्र.क्र.०४/९१/२०१५-१६ नागपूर दिनांक १९/०६/२०१५
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७ एप्रिल, २०१५
३) शासन निर्णय क्रमांक :चाबाप्र-२०१५/प्र.क्र.११०/फ-५, दि.२२ जुन, २०१५
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि.१२ जानेवारी, २०१६

प्रस्तावना:

श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक १२७७/२००० मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांना सादर केलेल्या श्वेत पत्रिकेच्या अनुषंगाने वन विभागास वन संरक्षणासाठी वन विकास करामधून प्राप्त झालेल्या निधीतून अतिरिक्त निधि उपलब्ध करुन देण्यात यावा असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी प्रधान लेखाशिर्ष ४४०६-वनीकरण व वन्य जीवन, १०२ (०८((०१) वन विकास करापासून मिळणा-या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) (योजनेत्तर) या शिर्षाखालील रु.१६६.९१ लक्ष एवढे अनुदान अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे. सदरहू योजनेचे महत्व व फलश्रुती विचारात घेता या प्रकल्पांतर्गत करावयाचे काम सन २०१५-१६ मध्ये चालू ठेवणे आवश्यक आहे.

शासन निर्णय:

रिट याचिका क्रमांक १२७७/२००० मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार वनसंरक्षणासाठी लेखाशिर्ष ४४०६-वनीकरण व वन्य जीवन, १०२ (०८)(०१) वन विकास करापासून मिळणा-या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) (योजनेत्तर) या शिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु.१६६.९१ लक्ष अनुदान अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे.

सदरहू योजनेसाठी शासन निर्णय संदर्भ क्र. ३ दिनांक २२ जुन, २०१५ नुसार रुपये ११६.८३७ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ४ दिनांक १२ जानेवारी, २०१६ नुसार मजूरीच्या १००%, कार्यालयीन खर्च व लहाण बांधकामे याकरिता ८५ % निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन रु.३८.६१ लक्ष (रु. अडुतीस लक्ष एकसष्ट हजार मात्र) इतका निधी

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता खालील प्रमाणे उद्दिष्ठ निहाय निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपशिर्ष	सन २०१५-१६ ची आर्थिक तरतूद (रु. लाखात)	वित्त विभागाचे दि.१७/४/२०१५ नुसार वितरीत निधी (रु. लाखात)	शिल्लक निधी (रु. लाखात)	वित्त विभागाच्या दिनांक १२/०१/२०१६ च्या परिपत्रकान्वये वितरणासाठी दिलेली मर्यादा	वितरीत करावयाचा निधी (रु. लाखात)
०२- मजूर	रु.९०.५२	रु.६३.३६४	रु.२७.१५६	१००%	रु.२७.१५६
१३- कार्यालयीन खर्च	रु.६६.७३	रु.४६.७११	रु.२०.०१९	८५%	रु.१०.००९
२७ - लहाण बांधकामे	रु.९.६६	रु.६.७६२	रु.२.८९८	८५%	रु.१.४४९
एकूण	रु.१६६.९१	रु.११६.८३७	रु.५०.०७३		**रु.३८.६१**

निधी वितरीत करतांना तसेच खर्च करतांना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर खर्च सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात प्रधान शिर्ष "४४०६- वनीकरण व वन्य जीवन, १०२ (०८) (०१) वन विकास करापासून मिळणा-या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) (योजनेत्तर) या लेखा शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

प्रस्तुत शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि.१२ जानेवारी, २०१६ ला अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१२३३४०३८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

DHAS ANIL N

Digitally signed by DHAS ANIL N
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917247, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DHAS ANIL N
Date: 2016.02.04 12:33:32 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर.

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४. महालेखापाल १ व २ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५. वित्त विभाग (अर्थ-६)/ (व्यय-१०) मंत्रालय, मुंबई ३२.

६. अवर सचिव (ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२

७. निवड नस्ती, फ-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२.